आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

*आयोजित*

# मुंबई ग्राहक पंचायत
# प्रशिक्षण शिबिर

दि. ५,६ डिसेंबर, २००९

# प्रशिक्षण शिबिर अहवाल

## कार्यशाळा – हेतू, विषय :

**दि. ५,६ सप्टेंबर, २००९** रोजी मुंबई ग्राहक पंचायत या संस्थेचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर प्रबोधिनीचे ज्ञान नैपुण्य केंद्र, भाईंदर येथे संपन्न झाले. या शिबिरात मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यकारिणीतील एकूण २३ पदाधिकारी व सदस्य (६ महिला व १७ पुरुष) प्रशिक्षणार्थी म्हणून सहभागी झाले होते.

## सहभागींच्या संख्येबाबतचा तपशील :

| जिल्हे | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| ४ | ६ | १७ | २३ |

शिबिराचे उद्घाटन मुंबई ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष श्री. विवेक पत्की, कार्याध्यक्ष ॲड. श्री. शिरीष देशपांडे यांच्या हस्ते झाले.

## शिबिरातील सत्रांचे विषयः

१. स्वयंसेवी संस्थांचे जग
२. संस्थेचे व्हिजन आणि मिशन
३. स्वयंसेवी संस्थांची व्यवसायनिष्ठता, कायदेशीर औपचारिकता आणि कार्यपध्दती
४. संस्थात्मक संबंध : जनसंपर्क, प्रतिनिधित्व आणि अन्य पैलू
५. संस्थात्मक नेतृत्व, सहभागिता आणि टीम कार्यपध्दती
६. नेतृत्वाच्या दुस-या फळीची जोपासना
७. स्वयंसेवी संस्थांसाठी वित्तीय अनुशासन
८. ग्राहक चळवळीपुढील आव्हाने

शिबिरातील सर्व विषयांची मांडणी प्रशिक्षण शिबिरासाठी आलेल्या सर्व उपस्थित शिबिरार्थींना सहभागी करत चर्चा आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून केली गेली. सहभागींना मार्गदर्शन करण्याकरिता विषयांचे तज्ञ डॉ. विनय सहस्त्रबुध्दे महासंचालक-रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, श्री. विवेक अत्रे, श्री. प्रशांत दिक्षित (ज्येष्ठ पत्रकार), डॉ. गिरीश जाखोटिया (प्राध्यापक) आणि चंद्रशेखर वझे (सी.ए.) हे वक्ते म्हणून लाभले होते.

डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी आपल्या पहिल्या सत्राची सुरुवात करतांना स्वयंसेवी संस्थांच्या इतिहासाची थोडी पुनरावृत्ती करुन २१व्या शतकातील स्वयंसेवी संस्थांचे जग कसे आहे आणि ते येणा-या काही वर्षात कसे असणार आहे यावर एक संक्षिप्त दृष्टिक्षेप टाकला. आज स्वयंसेवी संस्थांनी आधुनिक साधनांचा (संगणक, इंटरनेट, संस्थेची वेबसाईट,इ.) वापर करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. या साधनांची ओळख आणि त्याचा सातत्याने वापर करणे गरजेचे झाले आहे. संस्थांनी आपल्या चालू असलेल्या प्रकल्पांचे अथवा संशोधनांचे प्रलेखन (डॉक्युमेंटेशन) सातत्याने केले पाहिजे, अशा प्रकारे स्वयंसेवी संस्थेने आजच्या जगात सतत अपग्रेड कसे असले पाहिजे याबाबत डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी उत्तम मार्गदर्शन केले.



डॉ. विनय सहस्त्रबुध्दे **स्वयंसेवी संस्थांचे जग** हे सत्र घेतांना

दुस-या सत्रात श्री. विवेक अत्रे यांनी **संस्थेचे व्हिजन आणि मिशन** या त्यांच्या विषयाबाबत स्पष्टता येण्यासाठी उपस्थितांना सहभागी करुन घेऊन चर्चा घडवून आणली. तिसरे सत्र **स्वयंसेवी संस्थांची व्यवसायनिष्ठता, कायदेशीर औपचारिकता आणि कार्यपध्दती** या विषयावर होते. स्वयंसेवी संस्थांचे कायदे, त्यांची कार्यपध्दती याबाबत अधिक खोलवर माहिती त्यांनी दिली. संस्थांसाठी असणारे कायदे, त्यासाठी लागणारी कागदपत्रे व त्यांची पूर्तता तसेच कार्यालयीन कार्यपद्धतीबाबतच्या अत्यंत महत्वाच्या बाबींची माहिती श्री. अत्रे यांनी सत्रात दिली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून हे सत्र अधिक परिपक्व होत गेले.




**संस्थेचे व्हिजन आणि मिशन** हे सत्र घेतांना श्री. विवेक अत्रे

**संस्थात्मक संबंध: जनसंपर्क, प्रतिनिधित्व आणि अन्य पैलू** या विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रशांत दिक्षित यांचे चौथे सत्र होते. संस्थांनी प्रसार माध्यमांचा उपयोग आपले कार्य समाजासमोर मांडण्यासाठी केला पाहिजे. माध्यमांमुळे अपली प्रतिमा घडत असते आणि बिघडत देखील असते तेव्हा संस्थेने आपल्या प्रतिमेची काळजी घ्यायलाच हवी. आपल्या संस्थेची आपण मानलेली प्रतिमा आणि माध्यमांनी मानलेली प्रतिमा यात तफावत नसावी, याबाबत स्पष्टीकरण त्यांनी केले. संस्थेच्या कार्याची माहिती, एखाद्या कार्यक्रमाची बातमी कशी द्यावी इथपासून ते ती वृत्तपत्र कार्यालयातील कोणत्या योग्य आणि जबाबदार व्यक्तीकडे द्यावी याबाबतची माहिती वक्त्यांनी दिली. इंटरनेटच्या माध्यमातून आपल्या संस्थेला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेता येते आणि त्यासाठी संस्थेची एक वेबसाईट असणे अत्यंत आवश्यक आहे, याची जाणीव शिबिरार्थींनी करुन दिली.

दुस-या दिवशीची सकाळ प्रबोधिनीच्या परिसराचा फेरफटका मारण्यासाठी होती आणि या पदभ्रमणाचा सर्वांनी खूपच आनंद घेतला.

रविवार दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी ९.००वा. **संस्थात्मक नेतृत्व, सहभागिता आणि टीम कार्यपध्दती** या विषयावर गिरीश जाखोटिया यांचे एक सत्र झाले. पाच महत्वाच्या घटकांपासून संस्था तयार होते ते म्हणजे ध्येय, मूल्यव्यवस्था, कार्यकर्ते(कर्मचारी), साधने आणि पद्धती. या बाबींवर मुद्देसूद मांडणी वक्त्यांनी केली. संस्थात्मक नेतृत्व कसे असावे, त्याचा पाया कोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे यावर अत्यंत सुंदर असे विश्लेषण मांडण्यात आले.

श्री. गिरीश जाखोटिया यांचेच दुसरे सत्र **नेतृत्वाच्या दुस-या फळीची जोपासना** या विषयावर होते. नेतृत्व या शब्दाचे इंग्रजी भाषांतर असलेल्या **LEADER** या शब्दातील प्रत्येक अक्षराचे संस्थात्मक नेतृत्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असे विश्लषण वक्त्यांनी केले.

**L – Legitimate & Lighting,**
**E – Energy & Enlightenment,**
**A – Action Oriented & Actualization,**
**D – Divinity & Devotion,**
**E – Error Management & Eagerness,**
**R – Rationality & Reasonable.**

नेतृत्वाची दुसरी फळी निर्माण करण्याचे काही आयाम या सत्रात स्पष्ट करण्यात आले. एकूणच हे सत्र अत्यंत उपयुक्त असे ठरले.

**स्वयंसेवी संस्थांसाठी वित्तीय अनुशासन** या तिस-या सत्रात श्री. चंद्रशेखर वझे यांनी संस्थांनी आपल्या आर्थिक व्यवहारांची नोंद कशी ठेवावी, ८० जी, कर भरणे इ. महत्वाच्या आर्थिक विषयांची

सविस्तर मांडणी केली. मुंबई ग्राहक पंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी असणा-या सदस्यांनी आपल्या शंकांचे निरसन करुन घेतले, माहिती मिळवली. हे सत्र मोकळ्या वातावरणात झाले.

**ग्राहक चळवळीपुढील आव्हाने** या सत्राने संपूर्ण शिबिराचा समारोप झाला. या सत्रात मुंबई ग्राहकच्या उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी संस्थेच्या सद्यस्थितीबाबत आणि भविष्याबाबत आपापले विचार मांडले. त्यानंतर अध्यक्ष प्रा. गुजराथी यांचे सत्राचे सिंहावलोकन करणारे आणि सदस्यांना नवी उभारी देणारे असे भाषण झाले. संपूर्ण प्रशिक्षण शिबिराचे संचालन प्रकल्प समन्वयक मृदुल बापट यांनी केले.

**सहभागींचे अभिप्राय :**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यकारिणीतील सदस्यांनी या प्रशिक्षण शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला. प्रशिक्षण शिबिरातील सर्वच सहभागींनी सत्रांच्या विषयांबाबत आणि वक्त्यांबाबत समाधान व्यक्त केले. या शिबिरातील विषयांमुळे ज्ञानात अधिक भर पडली आणि संस्थेचे कामकाज करतांना या सर्व विषयांचा चांगला उपयोग होईल, अशी प्रतिक्रिया शिबिरार्थींनी व्यक्त केली. अशाप्रकारची कार्यशाळा वर्षातून दोनदा व्हावी अशीही इच्छा प्रत्येक सहभागीने व्यक्त केली.

*तक्रार मार्गदर्शन, ग्राहक प्रबोधन, संस्थेचा प्रचार व प्रसार* या विषयांवरही प्रशिक्षण आयोजित करावे, असा अभिप्राय काहींनी दिला. ग्राहक पंचायतीचे विविध स्तरावरील कार्यकर्ते, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासाठी *कौशल्य विकसन* या विषयावर एखादे प्रशिक्षण आयोजित करावे, असे काहींनी सूचित केले. शिबिरार्थींना *Self Evaluation* करण्याविषयी एखादे सत्र हेवे होते, अशी इच्छा व्यक्त करण्यात आली.

*********